तत्व/ नियम

ज्ञान आणि अनुभव याचा उहापोह झाली की सारासार मंथन होऊन माणसाचे विचार आणि मतं तयार होतात, ज्यात त्याचे कर्तृत्व व कौतुक असते त्याची तो तत्व बनवतो, कारण ती पाळणे त्याला सहजसाध्य असते, काळागणिक तत्वे ही सुख, आकांक्षा, प्रगती अन ध्येयाच्या आड यायला लागली की स्वार्थी माणूस हळूहळू त्या तत्वांना "नियम" असे गोंडस नाव देतो, व तत्व मोडायच्या वेळी, प्रत्येक नियमाला अपवाद असतोच ना !!! अशी वैचारिक खेळी करून स्वार्थ साधून घेतो, इथे तो स्वतःला फसवतो, व जिथे तो स्वतःला फसवतो तिथे फक्त नियमांनी शृंगारलेला मुखवटा राहतो, एकांतात गोमटा चेहरा उतरतो, पळवाटांच्या सुरकुत्या खोलवर आणि गडद उमटतात, एकांतात दुर्लक्षही होत नाही, त्यांना लपवता येत नाही, सगळी गुपिते, डावललेले तत्व, संधीसाधू अपवाद फेर धरून कोंडी करतात, माणूस गलबलतो, क्षणापुरतेच बाह्य जगातील आपले प्रथितयश वलय ध्यानात येते, उसासे; हुंदके मर्यादा सोडतात , फसवेपणा काळजात रुततो, डोळे बंद होतात, फाजील चेहरा स्वतःलाच पाहत असतो, बंद डोळ्यानी, अर्धमिटल्या पापण्या फक्त कर्तव्याला जागतात, अश्रूंचे बांध फोडायला...

सपु
www.saarthbodh.com
सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी